अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क. २४९२१२९२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- ०७/०३/२०२६

## -: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | १३०/२०२६, इंदिरा नगर पोलीस स्टेशन, नाशिक आयुक्तालय, नाशिक |
| कलम | कलम ७,७अ,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | १) सोमनाथ दत्तू पागे, राज्यकर उप आयुक्त, वस्तू व सेवाकर कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक<br>२) सचिन विठ्ठल बोंदे, सहायक राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक<br>३) अमित हिरामण जाधव, खाजगी इसम. |
| लाचेची मागणी | रू.१,२५,००,०००/, तडजोडीअंती रू. १,००,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | पहिला हप्ता म्हणून रू. २०,००,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे दामोदर चौक, नाशिक याठिकाणी कार्यालय असून उपरोक्त नमूद लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे कार्यालयावर जी.एस.टी. ची कारवाई करून तपास लवकर पुर्ण करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे रू. १,२५,००,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०१/०३/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०३/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान उपरोक्त नमूद लोकसेवक यांनी तपास लवकर पुर्ण करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती रू.१,००,००,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता म्हणून रू. २०,००,०००/- लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक ०६/०३/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांच्यावतीने खाजगी इसम अमित जाधव यांना तक्रारदार यांचेकडून पहिला हप्ता लाचेची रक्कम रूपये २०,००,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणून उपरोक्त नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांच्याविरुध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७,७अ,१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

सापळा अधिकारी :- श्री विजय चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त,
श्री. मोहन जगदाळे, पोलीस निरीक्षक

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२९२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
व्हॉट्सअप क्र. :- 8828241064 मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB